ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ५१ • सोमवार दि.१६ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

अजितदादांच्या निधनाने व्यक्तिगत नुकसान-अमित शहा

पुणे जिल्हा परिषदेत अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण



पुणे - राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने आपले व्यक्तीगत नुकसान झाले. ते स्पष्टवक्ते होते. त्यांच्या आठवणींचा उल्लेख करताना अमित शाह भावूक झाले. जे पटलं ते होय आणि जे नाही पटलं ते नाही, असे स्पष्टपणे सांगणारे अजितदादा होते. त्यांचा हा स्पष्टवक्तेपणा मला खूप आवडायचा, अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांच्या स्वभावाचे कौतुक केले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते पुणे जिल्हा परिषद परिसरात करण्यात आले. या सोहळ्यात अजितदादांच्या कार्याचा आणि या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, खा. सुप्रिया सुळे, ना. दत्ता भरणे, मुरलीधर मोहोळ, माधुरी मिसाळ आणि महापौर मंजुषा नागपुरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

अमित शाह यांनी अजित पवारांसोबतच्या राजकीय आणि व्यक्तिगत आठवणींना उजाळा दिला. महायुतीतील जागावाटपाच्या चर्चेदरम्यान अजितदादा आपली भूमिका स्पष्टपणे मांडत असत. अजित पवारांचे व्यक्तिमत्त्व सकारात्मक आणि स्पष्टवक्ते होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले असून माझेही व्यक्तिगत नुकसान झाले आहे, अशी भावना शाह यांनी व्यक्त केली. कोरोना काळातील आठवण सांगताना ते म्हणाले की, त्या काळात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांशी संपर्क होणे कठीण होते; मात्र अजितदादांचा कामासंदर्भात नियमित फोन येत असे. अनेकदा सकाळी सात वाजता लँडलाईनवरून त्यांच्याशी चर्चा होत असे. एवढचा सकाळीही ते कामासाठी तत्पर असायचे, असे शाह यांनी सांगितले.

सहकार क्षेत्रातील प्रश्न, साखर पान ४ वर

अपघाताचा अहवाल लवकर द्या-मुख्यमंत्री

पुणे : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताचा अहवाल लवकरात लवकर समोर यावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे केली. अपघाताबाबत संपूर्ण स्पष्टता यावी आणि तपासात कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. पुणे जिल्हा परिषद परिसरातील यशवंतराव चव्हाण भवन येथे अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या अनावरण सोहळ्यात ते बोलत होते.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भारतीय किसान संघ आक्रमक

माहूर/प्रतिनिधी- खरीप हंगामातील पिकांचे नुकसान, शेतकऱ्यांना अपेक्षित शासकीय मदत न मिळणे तसेच देवस्थान इनाम जमिनींच्या प्रश्नांवरून भारतीय किसान संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी माहूर तहसील कार्यालयासमोर १६ नोव्हेंबर पासून अभिनव महामुक्काम आंदोलन सुरु केले आहे.

यासंदर्भात तहसीलदार माहूर यांना निवेदन सादर करण्यात आले होते. निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी नैसर्गिक संकटांचा सामना करीत आहेत. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान होऊनही शेतकऱ्यांना अपेक्षित आर्थिक आधार मिळत नाही. शासनाच्या विविध योजनांचा लाभही अनेक पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. भारतीय किसान संघटनेच्या वतीने यापूर्वीही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आंदोलने व पाठपुरावा करण्यात आला; मात्र प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप करतआता मागण्यांची पूर्तता होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार कॉ.शंकर सिडाम व कॉ.किशोर पवार यांच्या सह आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

श्री गुरुनानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त नांदेड-बिदर विशेष रेल्वे

नांदेड/प्रतिनिधी-श्री गुरुनानक देवजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बिदर येथे आयोजित धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवास करणाऱ्या भाविकांची तसेच इतर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत हजूर साहिब नांदेड ते बिदर दरम्यान विशेष रेल्वे चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



या विशेष रेल्वेमुळे हजूर साहिब नांदेड आणि बिदर या दोन महत्त्वाच्या धार्मिक स्थळांदरम्यान प्रवास करणाऱ्या भाविकांना तसेच मार्गावरील इतर प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. वाढीव प्रवासी गर्दीचे नियोजन करण्यासाठी आणि प्रवाशांना सुरक्षित व सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही विशेष रेल्वे चालविण्यात येणार आहे. गाडी क्रमांक ०७६१५ हजूर साहिब नांदेड ते बिदर ही विशेष रेल्वे सोमवार दि.२३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता हजूर साहिब नांदेड येथून प्रस्थान बिदर येथे १६:३० पोहचेल. गाडी क्रमांक ०७६१६ ही विशेष रेल्वे बुधवार दि. २५ नोव्हेंबर रोजी दुपारी १५.३० वाजता बिदर येथून प्रस्थान करणार आहे. रात्री ११.३० वाजता हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर पोहचेल. या विशेष रेल्वेला एकूण २१ डबे जोडण्यात येणार असून त्यामध्ये ३ एसी चेअर कार, ५ एसी ३-टियर, ७ स्लीपर क्लास, ४ जनरल डबे आणि २ सेकँड क्लास लगेज-कम-ब्रेक व्हॅन (एसएलआर) यांचा समावेश आहे. या रेल्वेला विशेष भाडे लागू राहणार असून नियमित भाड्याच्या १.३ पट दराने भाडे आकारण्यात येणार आहे. या विशेष रेल्वेचा हजूर साहिब नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, उदगीर, कमालनगर, भालकी आणि बिदर परिसरातील भाविक व प्रवाशांना लाभ होणार आहे.




आदिवासी कोळी समाजाच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर सोमवारी निषेध आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात आदिवासी कोळी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष नागनाथ घीसेवाड, ॲड.परमेश्वर गोणारे, बसपाचे महाराष्ट्र प्रभारी मनिष कावळे यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी कोळी समाजबांधव सहभागी झाले होते.

अमिताभ बच्चन यांच्या घरावरील हल्ल्याचा कट उधळला

मुंबई/प्रतिनिधी- बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांच्या मुंबईतील जुहू परिसरातील जलसा बंगल्याबाहेर गोळीबार करण्याचा कट दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने उधळून लावल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी मुंबई आणि दिल्लीतून दोन संशयित शूटरना अटक केली आहे.

पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची नावे विकास ठाकूर उर्फ विकी (जालंधर) आणि दीपक सिंग (तरनतारन) अशी



आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, दीपक सिंग अमिताभ बच्चन यांच्यावर गोळीबार करण्याच्या तयारीत असताना मुंबईत पकडला गेला, तर विकास ठाकूर याला दिल्लीत अटक करण्यात आली. विशेष म्हणजे, १९८४ च्या शीखविरोधी दंगलींबाबत अमिताभ बच्चन यांनी केलेल्या वक्तव्याचा बदला घेण्यासाठी परदेशात वास्तव्यास असलेल्या एका गुंडाने अभिनेत्यावर हल्ला करण्याची जबाबदारी दिल्याचा आरोप आहे. या कटामागील सूत्रधार आणि इतर संभाव्य साथीदारांचा शोध पोलीस घेत आहेत. तपासात विकास ठाकूर याचे विविध गुन्हेगारी टोळ्यांशी संबंध असल्याचे समोर आले आहे. अनमोल पान ४ वर

खा.अशोक चव्हाण यांनी दत्तक घेतलेले राजवाडी गाव विकासापासून वंचित

जयराम वन्ने

मुदखेड- मुदखेड तालुक्यातील मौजे राजवाडी हे गाव दत्तक घेत असल्याची घोषणा खा.अशोकराव चव्हाण यांनी निवडणूक काळातील प्रचारा दरम्यान केली होती. परंतु या गावात अद्याप कोणतेही विकासाची कामे सुरु करण्यात आली नाहीत.

लोकसभा निवडणुकीत भाजप उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत खा.अशोक चव्हाण यांनी राजवाडी येथे बोलतांना राजवाडी हे गाव मी दत्तक घेत आहे अशी घोषणा केली होती. निवडणुकीची आचारसहिता संपताच या गावाचा कायापालट होईल सर्व विकासकामे मार्गी लागतील असे आश्वासन दिले होते. या गावातील सर्व सोयी सुविधा मिळवून देण्याची माझी जबाबदारी आहे अशी ग्वाही खा.अशोक चव्हाण यांनी प्रचार सभेत बोलतांना दिली होती. खा.अशोक चव्हाण यांच्या घोषणेमुळे राजवाडी येथील ग्रामस्थांमध्ये उत्साह निर्माण झाला होता. राजवाडी गावाचा विकास होवून कायापालट होईल अशी आशा त्यांना वाटू लागली. लोकसभेची निवडणूक होवून आता जवळपास अडीच वर्षे झाले आहेत. परंतु राजवाडी



गावात अद्याप पर्यंत कोणतीही विकासाची कामे सुरु झाली नाहीत. राजवाडी गाव विकासासाठी दत्तक घेण्याच्या घोषणेचा खा.अशोक चव्हाण यांना विसर पडला आहे का? अशी चर्चा जनतेत सुरु आहे. निवडणुकीत जनतेला दिलेले आश्वासन दिशाभूल करणारे होते की काय असा प्रश्न राजवाडी ग्रामस्थांना निर्माण झाला आहे. राजवाडी या गावची लोकसंख्या सुमारे हजार ते बाराशे असून या गावात सर्व जाती धर्माचे लोक आनंदाने व गुण्या गोविंदाने वास्तव्यास आहेत. गाव अतिशय छोटा असल्यामुळे या गावचा विकास करण्यास निधीही कमी लागते. परंतु अद्याप तरी हे गाव विकासापासून वंचितच आहे. गावातील वस्तीवाढ साठी जागा उपलब्ध करणे गरजेचे आहे. रस्ते, नाली, स्मशानभूमी, पाणी प्रश्न या सारख्या नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणे गरजेचे आहे. खा.अशोक चव्हाण यांनी राजवाडी गाव दत्तक घेण्याची केलेल्या घोषणेची अंमलबजावणी करुन गावाच्या विकासासाठी निधी द्यावा अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

ऐन हिवाळ्यातच माहूरकरांना पाण्याचे संकट;उपलब्ध पाणीसाठा मोजक्याच दिवसांचा

माहूर/प्रतिनिधी-कधीकाळी दुथडी भरून वाहणारी आणि माहूर तालुक्याची जीवनवाहिनी मानली जाणारी पैनगंगा नदी यंदा नोव्हेंबर महिन्याच्या उत्तरार्धातच कोरडीठाक पडली आहे. मार्च व एप्रिल महिन्यातही खळखळून वाहणाऱ्या नदीचे पात्र यंदा पाण्याविना उजाड झाले असून, नदी-नाल्यांचा प्रवाह पूर्णपणे थांबला आहे. त्यामुळे ऐन हिवाळ्यातच माहूर शहरासह संपूर्ण तालुक्यावर भीषण पाणीटंचाईचे सावट निर्माण झाले आहे.

यंदा पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने सुरुवातीपासूनच तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने जलस्रोतांमध्ये अपेक्षित पाणीसाठा जमा झाला नाही. त्यातच आता पैनगंगा नदीचे पात्रही कोरडे पडल्याने पाणीटंचाईच्या संकटात आणखी भर पडली आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये आतापासूनच पाण्याची समस्या जाणवू लागली असून, उपलब्ध पाणीसाठा केवळ काही दिवस पुरेल एवढाच असल्याचे चित्र आहे.



साधारणपणे हिवाळा संपून उन्हाळा सुरु झाला तरी पावसाळ्यानंतरही पैनगंगा नदी दुथडी भरून वाहताना दिसत असे. मात्र यंदा परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. नोव्हेंबर महिन्यातच नदीपात्रातील पाणी आटल्याने आगामी काळातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हिवाळ्यातच अशी परिस्थिती निर्माण झाली असेल, तर उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागण्याची चिन्हे दिसत आहेत. माहूर शहराची लोकसंख्या, वाढत्या पाण्याच्या गरजा आणि धार्मिक पर्यटनासाठी दरवर्षी येणाऱ्या हजारो भाविकांचा विचार करता पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे प्रशासनासमोर मोठे आव्हान ठरणार आहे. सध्या उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करणे, संभाव्य टंचाईग्रस्त गावांची पाहणी करणे आणि पर्यायी जलस्रोतांची व्यवस्था करणे आवश्यक झाले आहे. ऐन हिवाळ्यातच पाण्याचे संकट दारात येऊन ठेपले असताना प्रशासन आता कोणती उपाययोजना करणार? पाण्याचे नियोजन वेळेत होणार की उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागणार? हा प्रश्न सध्या माहूरकरांसह तालुक्यातील ग्रामस्थांना सतावत आहे.

पैनगंगेने साथ सोडली; आता भोजन्ती तलावाकडे माहूरकरांच्या आशा!

माहूर शहरात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर भोजंती तलावातील पाणी नागरिकांच्या पिण्यासाठी उपलब्ध करून द्यावे, अशी विनंती नगरपंचायतीने श्री देवदेवेश्वर संस्थानचे महंत मधुकर शास्त्री कविश्वर महाराज यांच्याकडे केली आहे. याबाबत नगराध्यक्ष फिरोज दोसानी व मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी लेखी निवेदन दिले. यापूर्वी २०१७ व २०२१ मध्ये पान ४ वर

तर उद्याचे काय?

पाणी म्हणजे जीवन! ही केवळ चार शब्दांची घोषणा नाही, तर संपूर्ण सृष्टीच्या अस्तित्वाचा मूलभूत आधार आहे. पृथ्वीवर जीवसृष्टी निर्माण होण्यापासून ते मानवी संस्कृतीच्या विकासापर्यंत पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण राहिले आहे. नद्यांच्या काठावर संस्कृती विकसित झाल्या, शेती फुलली, गावे आणि शहरे वसली. मात्र आज याच पाण्याच्या प्रश्नाने संपूर्ण मानवजातीसमोर गंभीर आव्हान उभे केले आहे. एकीकडे पाण्याचे स्रोत आटत आहेत, भूजल पातळी खालावत आहे, नद्या प्रदूषित होत आहेत, तर दुसरीकडे पाण्याचा अमर्याद आणि बेजबाबदार वापर सुरूच आहे. अशा परिस्थितीत एक प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे, तो म्हणजे पाणी आत्ताच जपले नाही तर उद्याच्या पिढ्यांचे काय? महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात पाण्याचे महत्त्व वेगळे सांगण्याची गरज नाही. राज्यातील मोठा वर्ग शेतीवर अवलंबून आहे. पाऊस चांगला झाला तर शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलतो आणि पावसाने पाठ फिरवली तर संपूर्ण अर्थव्यवस्थेवर त्याचे परिणाम दिसून येतात. पावसाचे अनिश्चित स्वरूप, हवामानातील बदल, वाढते तापमान आणि पाण्याचे चुकीचे नियोजन यामुळे दुष्काळाची समस्या अधिक गंभीर होत आहे. पावसाळ्यात पाणी वाहून जाते आणि उन्हाळ्यात त्याच पाण्यासाठी नागरिकांना वणवण करावी लागते. ही परिस्थिती केवळ निसर्गाची अवकृपा म्हणून नाकारता येणार नाही. त्यामागे मानवी हस्तक्षेप आणि नियोजनाचा अभावही तितकाच जबाबदार आहे. विशेष म्हणजे पाणीटंचाईचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील सामान्य नागरिक, शेतकरी, महिला आणि पशुधनाला बसतो. पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना मैलोनमैल पायपीट करावी लागते. जनावरांसाठी चारा आणि पाणी उपलब्ध होत नाही. शेतातील पिके डोळ्या देखत जळून जातात. अशा वेळी दुष्काळी उपाययोजनांच्या घोषणा होतात, टँकर सुरू होतात, चारा छावण्यांची चर्चा होते; परंतु पाण्याचे दीर्घकालीन नियोजन करण्याबाबत अपेक्षित गांभीर्य अनेकदा दिसत नाही. प्रत्येक वर्षी दुष्काळ पडल्यावर उपाययोजना करण्यापेक्षा दुष्काळ निर्माण होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. दुसरीकडे शहरांमधील पाण्याची परिस्थितीही चिंताजनक आहे. पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाइनमधून होणारी गळती, अनियंत्रित बांधकामे, भूजलाचा बेसुमार उपसा, तलाव आणि नाल्यांवर होणारे अतिक्रमण यामुळे पाण्याचे नैसर्गिक स्रोत नष्ट होत आहेत. काही ठिकाणी पिण्याचे पाणी वाहनांच्या धुलाईसाठी आणि अनावश्यक वापरासाठी खर्च केले जाते, तर दुसरीकडे झोपडपट्ट्यांमधील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो. पाण्याचे वितरणच जर विषम असेल तर सामाजिक न्यायाच्या संकल्पनेलाही अर्थ उरत नाही. पाण्याच्या प्रश्नाकडे केवळ सरकारच्या जबाबदारीच्या चौकटीतून पाहून चालणार नाही. शासन, प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. जलसंधारणाच्या योजना कागदावर न राहता प्रत्यक्ष जमिनीवर उतरल्या पाहिजेत. गावागावांत शेततळी, बंधारे, नाला खोलीकरण, जलपुनर्भरण आणि वृक्षलागवड यांसारख्या उपाययोजनांना प्राधान्य दिले पाहिजे. पावसाचे पाणी अडविणे, जिरविणे आणि त्याचा योग्य वापर करणे ही काळाची गरज आहे. केवळ मोठमोठी धरणे बांधून पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. उपलब्ध पाण्याचे योग्य व्यवस्थापन आणि न्याय्य वितरण करणेही तितकेच आवश्यक आहे. शेतीमध्येही पाण्याच्या वापराबाबत नवा दृष्टिकोन स्वीकारावा लागेल. ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या आधुनिक पद्धतींचा अधिकाधिक वापर, पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन पीकपद्धतीत बदल आणि भूजल पुनर्भरण यावर भर द्यावा लागेल. पाण्याची कमतरता असलेल्या भागात पाण्याचा अधिक वापर करणाऱ्या पिकांबाबतही शास्त्रीय आणि स्थानिक परिस्थितीला अनुरूप धोरण आखण्याची गरज आहे. परंतु सर्वांत महत्त्वाचा प्रश्न मानसिकतेचा आहे. पाणी नळातून येते म्हणजे ते अमर्याद उपलब्ध आहे, असा गैरसमज समाजातून दूर झाला पाहिजे. घरातील नळ उघडा ठेवणे, वाहन धुण्यासाठी पिण्याचे पाणी वापरणे, पाण्याची गळती दुर्लक्षित करणे या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींचे एकत्रित परिणाम मोठे असतात. प्रत्येक घराने पाणी बचतीची सवय लावली पाहिजे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी जलसाक्षरतेची चळवळ उभी केली पाहिजे. पाण्याचा प्रश्न हा केवळ आजच्या पिढीचा प्रश्न नाही, तर उद्याच्या पिढ्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. आपण आपल्या पुढील पिढ्यांना संपत्ती, घरे आणि सुखसोयी देण्याचा प्रयत्न करतो; पण त्यांना पिण्यासाठी पुरेसे पाणीच उपलब्ध नसेल तर या संपत्तीचा उपयोग काय? विकासाच्या नावाखाली निसर्गाचे संतुलन बिघडवून आपण कोणत्या भविष्याची पायाभरणी करीत आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. महात्मा गांधींनी निसर्गाच्या साधनसंपत्तीचा वापर गरजेपुरता करण्याचा विचार मांडला होता. आजच्या पिढीने हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची आवश्यकता आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे ही केवळ पर्यावरणप्रेमींची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. शेवटी, पाणी ही निसर्गाने मानवाला दिलेली अमूल्य देणगी आहे; ती कोणत्याही पिढीची खासगी मालमत्ता नाही. आज आपण पाण्याचा अपव्यय केला तर उद्या आपल्या मुलांना आणि नातवंडांना त्याची किंमत मोजावी लागेल. दुष्काळ पडल्यावर पाण्याचे महत्त्व समजण्यापेक्षा पाणी उपलब्ध असतानाच त्याचे मोल ओळखणे आवश्यक आहे. कारण पाण्याशिवाय विकास नाही, शेती नाही, उद्योग नाही आणि जीवनही नाही. आज पाण्याचा थेंब वाचविण्याची वेळ आहे; उद्या कदाचित थेंबासाठी संघर्ष करण्याची वेळ येईल. म्हणूनच पाणी आत्ताच जपले नाही, तर उद्याचे भविष्य तहानलेले असेल!

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी क्रांतिवीरांचे योगदान



भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे आणि जनजातीय गौरव दिनाचे औचित्य साधून भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी वीर-वीरांगनांच्या शौर्याचे स्मरण करणे आणि त्यांच्या पराक्रमाची सुवर्णगाथा जनमानसासमोर मांडणे, हा या लेखाचा उद्देश आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आदिवासी समाजाने दिलेले योगदान, केलेला त्याग आणि आपल्या हक्कांच्या रक्षणासाठी उभारलेला संघर्ष हा भारतीय इतिहासातील एक प्रेरणादायी अध्याय आहे.

ज्यांच्या बलिदानाने जंगलांची माती पावन झाली, ज्यांच्या धगधगत्या बाणांनी ब्रिटिश साम्राज्याच्या पायाला हादरे दिले आणि ज्यांच्या हुंकाराने स्वातंत्र्यलढ्याला नवी प्रेरणा मिळाली, त्या आदिवासी क्रांतिवीरांच्या असीम पराक्रमाची ही इतिहासाच्या पानांवर कोरलेली अमर गाथा आहे! भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ काही मोजक्या क्रांतिकारकांच्या संघर्षाचा इतिहास नाही. या इतिहासात देशाच्या कानाकोपऱ्यातील असंख्य ज्ञात-अज्ञात वीर-वीरांगनांचे योगदान आहे. घनदाट जंगलांच्या कुशीत, डोंगर-दऱ्यांच्या सान्निध्यात आणि निसर्गाशी अतूट नाते जपत जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजानेही स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. जल, जंगल आणि जमिनीवरील पारंपरिक हक्कांच्या संरक्षणासाठी त्यांनी उभारलेले संघर्ष भारतीय इतिहासात विशेष महत्त्वाचे ठरले आहेत. ब्रिटिश सत्तेने आदिवासी समाजाच्या जंगल, जमीन आणि पारंपरिक हक्कांवर निर्बंध घातले. त्यांच्या उपजीविकेच्या साधनांवर मर्यादा आणल्या. अन्यायकारक महसूल व्यवस्था, सावकारांचे शोषण आणि ब्रिटिशांच्या दडपशाहीमुळे आदिवासी समाजात असंतोष निर्माण झाला. या अन्यायाविरुद्ध आदिवासी बांधवांनी संघटित होऊन संघर्ष उभारला. पारंपरिक धनुष्यबाण, तीरकामठे आणि स्थानिक भौगोलिक परिस्थितीच्या ज्ञानाच्या बळावर त्यांनी आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेल्या ब्रिटिश सैन्याला कडवा प्रतिकार केला. गनिमी काव्याचा अवलंब करून अनेक आदिवासी क्रांतिवीरांनी ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले. आदिवासी समाजाचा हा संघर्ष केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरता मर्यादित नव्हता. त्यामध्ये सामाजिक न्याय, सांस्कृतिक अस्मिता, स्वाभिमान आणि पारंपरिक हक्कांच्या संरक्षणाची प्रेरणाही होती. जनजातीय गौरव दिनानिमित्त या संघर्षातील काही प्रमुख क्रांतिवीरांच्या कार्याचे स्मरण करणे आवश्यक आहे.

भगवान बिरसा मुंडा

झारखंडमधील छोटानागपूर परिसरात जन्मलेले भगवान बिरसा मुंडा हे आदिवासी समाजाच्या स्वाभिमानाचे आणि संघर्षाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी उलगुलान अर्थात महाउठावाचा नारा देत ब्रिटिश सत्तेविरुद्ध आदिवासी समाजाला संघटित केले. आदिवासींच्या जमिनीवरील पारंपरिक हक्कांचे संरक्षण, शोषणकारी व्यवस्थेला विरोध आणि स्वशासनाची स्थापना ही त्यांच्या संघर्षाची प्रमुख उद्दिष्टे होती. ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणांविरुद्ध त्यांनी व्यापक जनजागृती केली. पारंपरिक धनुष्यबाणांच्या साहाय्याने ब्रिटिशांच्या आधुनिक शस्त्रास्त्रांना प्रतिकार केला. त्याचबरोबर आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा आणि सामाजिक अस्मिता जपण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनामुळे ब्रिटिश प्रशासनासमोर मोठे आव्हान निर्माण झाले. आदिवासी समाजात धरती आबा आणि भगवान म्हणून आदराचे स्थान मिळविणारे बिरसा मुंडा हे सामाजिक परिवर्तनाचेही प्रेरणास्थान ठरले. ब्रिटिशांनी त्यांना अटक करून रांची येथील कारागृहात ठेवले. ९ जून १९०० रोजी वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी कारागृहात त्यांचा मृत्यू झाला. अल्पायुष्यात त्यांनी उभारलेला संघर्ष आदिवासी समाजाच्या शौर्याचे आणि स्वाभिमानाचे अमर प्रतीक ठरला.

सिदो आणि कान्हू मुर्मू

सन १८५५-५६ मधील ऐतिहासिक संथाळ उठावात सिदो आणि कान्हू मुर्मू या वीरबंधूंनी महत्त्वपूर्ण नेतृत्व केले. ब्रिटिशांचे अन्यायकारक कायदे, शोषणकारी महसूल व्यवस्था, जमीनदारांची दडपशाही आणि सावकारांच्या जाचाविरुद्ध त्यांनी हजारो संथाळ आदिवासींना संघटित केले.

३० जून १८५५ रोजी सुरू झालेला संथाळ हूल हा ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या महत्त्वपूर्ण आदिवासी उठावांपैकी एक होता. या संघर्षात आदिवासी बांधवांनी पारंपरिक शस्त्रांच्या साहाय्याने ब्रिटिश सैन्याला कडवा प्रतिकार केला. अखेर ब्रिटिशांनी हा उठाव दडपला. मात्र, सिदो आणि कान्हू मुर्मू यांच्या नेतृत्वाखालील या संघर्षाने आदिवासी समाजात स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा निर्माण केली. मध्य भारत आणि खान्देशातील आदिवासी समाजाच्या संघर्षात तंट्या भिल्ल यांचे नाव आदराने घेतले जाते. तंट्या मामा म्हणून ओळखले जाणारे हे क्रांतिवीर गोरगरिबांचे कैवारी आणि ब्रिटिश सत्तेचे कडवे विरोधक होते. त्यांच्या धाडसी कारवायांमुळे ब्रिटिश प्रशासनासमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. ब्रिटिशांची संपत्ती लुटून गरजूंमध्ये वाटणारे तंट्या भिल्ल हे भारतीय रॉबिनहुड म्हणून प्रसिद्ध झाले. गरिबांवरील अन्यायाविरुद्ध त्यांनी संघर्ष केला. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी आणि स्वाभिमानासाठी त्यांनी दिलेला लढा आजही प्रेरणादायी मानला जातो. त्यांच्या कार्यामुळे ब्रिटिशविरोधी संघर्षाला नवी दिशा आणि बळ मिळाले. आंध्र प्रदेशातील आदिवासी समाजाच्या ब्रिटिशविरोधी संघर्षात अल्लुरी सीताराम राजू यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. ब्रिटिशांच्या वनविषयक धोरणांमुळे आदिवासी समाजाच्या पारंपरिक हक्कांवर निर्बंध आले होते. या अन्यायाविरुद्ध त्यांनी आदिवासी बांधवांना संघटित केले. सन १९२२ ते १९२४ या कालावधीत त्यांनी रम्पा उठाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सशस्त्र आंदोलनाचे नेतृत्व केले. गनिमी काव्याचा प्रभावी वापर करून त्यांनी ब्रिटिश सैन्याला आव्हान दिले. आदिवासी समाजाच्या पारंपरिक हक्कांसाठी संघर्ष करणारे अल्लुरी सीताराम राजू हे स्वातंत्र्यलढ्यातील एक प्रेरणादायी नेतृत्व ठरले. त्यांच्या शौर्यामुळे त्यांना मन्यम वीरुडू अर्थात जंगलाचा वीर म्हणूनही ओळखले जाते. भारतीय इतिहासातील आदिवासी समाजाच्या संघर्षात पुरुषांबरोबरच महिलांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. शौर्य, त्याग, स्वाभिमान आणि नेतृत्वाचा आदर्श घालून देणाऱ्या अनेक आदिवासी वीरांगनांनी अन्यायकारक सत्तेविरुद्ध संघर्ष केला. काहींनी प्रत्यक्ष रणांगणात शस्त्र हाती घेतले, तर काहींनी क्रांतिकारकांना संघटित करून त्यांच्या लढ्याला बळ दिले.

गोंडवाना साम्राज्याच्या राणी दुर्गावती या आदिवासी समाजाच्या ऐतिहासिक शौर्यपरंपरेतील एक महान वीरांगना म्हणून ओळखल्या जातात. त्यांचा संघर्ष ब्रिटिश राजवटीपूर्वीचा असून, सोळाव्या शतकात त्यांनी मुघल सत्तेविरुद्ध आपल्या राज्याच्या संरक्षणासाठी लढा दिला. मुघल सम्राट अकबराच्या कारकिर्दीत आसफ खानाच्या नेतृत्वाखालील सैन्याने गोंडवाना राज्यावर आक्रमण केले. या आक्रमणाला राणी दुर्गावती यांनी अतुलनीय शौर्याने प्रतिकार केला. शरणागती पत्करण्याऐवजी त्यांनी स्वाभिमानासाठी प्राणार्पण केले. त्यांचे बलिदान हे स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि मातृभूमीच्या रक्षणासाठीच्या संघर्षाचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

वीरांगना राणी गाइदिन्ल्यू

मणिपूरमधील रोंगमेई नागा समाजातील राणी गाइदिन्ल्यू या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक महान आदिवासी वीरांगना होत्या. वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी त्या हायपो जादोनांग यांच्या नेतृत्वाखालील सामाजिक, धार्मिक आणि ब्रिटिशविरोधी चळवळीत सहभागी झाल्या.

सन १९३१ मध्ये ब्रिटिशांनी जादोनांग यांना फाशी दिल्यानंतर राणी गाइदिन्ल्यू यांनी या आंदोलनाचे नेतृत्व स्वीकारले. आदिवासी समाजाची संस्कृती, पारंपरिक श्रद्धा आणि स्वशासनाच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. हेराका चळवळीच्या माध्यमातून त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती केली आणि आदिवासी बांधवांना संघटित केले. ब्रिटिशांनी सन १९३२ मध्ये त्यांना अटक करून जन्मठेपेची शिक्षा सुनावली. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन १९४७ मध्ये त्यांची सुटका झाली. त्यांच्या शौर्याचा गौरव करताना जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना राणी म्हणून संबोधले. राणी गाइदिन्ल्यू यांचे जीवन आदिवासी समाजातील महिलांच्या धैर्याचे, नेतृत्वाचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. याशिवाय संथाळ उठावातील फुलो आणि झानो या वीरांगनांचे योगदानही विशेष उल्लेखनीय आहे. गोंड, भिल्ल आणि इतर आदिवासी समाजांतील अनेक ज्ञात-अज्ञात महिलांनी ब्रिटिशविरोधी संघर्षात सहभाग घेतला. क्रांतिकारकांना अन्न, आश्रय आणि आवश्यक मदत पुरविण्याबरोबरच अनेक महिलांनी प्रत्यक्ष संघर्षातही योगदान दिले. या वीरांगनांच्या त्यागामुळे आदिवासी समाजाच्या स्वातंत्र्यलढ्याला अधिक बळ मिळाले. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास पाहिला, तर स्वातंत्र्य मिळविण्यासाठी असंख्य क्रांतिवीरांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिल्याचे दिसून येते. या संघर्षात आदिवासी समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी आहे. अनेक आदिवासी क्रांतिकारकांनी कोणत्याही व्यक्तिगत लाभाची अपेक्षा न ठेवता आपल्या भूमीच्या, संस्कृतीच्या आणि पारंपरिक हक्कांच्या संरक्षणासाठी संघर्ष केला. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांविरुद्ध लढताना त्यांनी अनेक संकटांचा सामना केला. आधुनिक शस्त्रास्त्रांचा अभाव, आर्थिक अडचणी आणि ब्रिटिश सैन्याचे सामर्थ्य यांची पर्वा न करता आदिवासी बांधवांनी आपला संघर्ष सुरू ठेवला. त्यांच्या या लढ्यातून स्वातंत्र्य, समानता, सामाजिक न्याय आणि स्वाभिमानाची मूल्ये अधोरेखित झाली. आज आपण स्वातंत्र्याची मोकळी हवा अनुभवत आहोत. या स्वातंत्र्याच्या पायाभरणीत असंख्य ज्ञात-अज्ञात वीर-वीरांगनांच्या त्यागाचा आणि बलिदानाचा वाटा आहे. त्यांच्या संघर्षाचा इतिहास पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे ही आपली सामाजिक आणि राष्ट्रीय जबाबदारी आहे. भगवान बिरसा मुंडा यांची जयंती आणि जनजातीय गौरव दिन हा केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा दिवस नाही, तर आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास, समृद्ध संस्कृती आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचे स्मरण करण्याचा महत्त्वपूर्ण प्रसंग आहे. त्यांच्या संघर्षातून प्रेरणा घेऊन सामाजिक न्याय, एकता, समानता आणि स्वाभिमानाची मूल्ये जपण्याचा संकल्प करण्याची ही वेळ आहे. आदिवासी क्रांतिवीरांनी आपल्या आयुष्याचा त्याग करून स्वातंत्र्यलढ्याला नवी ऊर्जा दिली. त्यांच्या शौर्याची आणि बलिदानाची ही अमर गाथा केवळ इतिहासाच्या पानांपुरती मर्यादित न राहता प्रत्येक भारतीयाच्या मनात कायम प्रेरणादायी ठरली पाहिजे.भारतीय स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देणाऱ्या सर्व आदिवासी क्रांतिवीरांच्या आणि वीरांगनांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन!

प्रिती बोंद्रे (केळकर)
सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,
अनुसुचीत जमाती प्रमाणपत्र
तपासणी समिती,छ.संभाजीनगर-१

लोकशाहीचा पहारेकरी आणि जनसामान्यांचा निर्भीड आवाज : 'नांदेड वार्ता'!

लोकशाही व्यवस्थेत वृत्तपत्र हे केवळ बातम्यांचे माध्यम नसते, तर ते समाजाचे प्रतिबिंब, जनतेच्या भावनांचे व्यासपीठ आणि सत्ताधाऱ्यांच्या उत्तरदायित्वाची जाणीव करून देणारे प्रभावी साधन असते. शासनाच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे, प्रशासनाच्या कामकाजातील त्रुटी उजेडात आणणे आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांना वाचा फोडणे, ही निर्भीड पत्रकारितेची खरी ओळख आहे. नांदेडच्या पत्रकारितेच्या क्षेत्रात गेल्या पंचवीस वर्षांपासून आपली स्वतंत्र ओळख जपणारे सांज दैनिक 'नांदेड वार्ता' हे त्याचे एक महत्त्वपूर्ण उदाहरण म्हणता येईल.

वृत्तपत्र सुरू करणे सोपे असते; परंतु बदलत्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीत त्याची विश्वासार्हता टिकवून ठेवत पंचवीस वर्षांचा प्रवास करणे ही निश्चितच आव्हानात्मक बाब आहे. या प्रवासामागे केवळ व्यावसायिक दृष्टिकोन नसून पत्रकारितेप्रती असलेली निष्ठा, सामाजिक भान आणि वैचारिक बांधिलकी असणे आवश्यक असते. 'नांदेड वार्ता'च्या वाटचालीकडे पाहताना या बाबींचा विचार करावा लागतो. वृत्तपत्राचे मालक तथा मुख्य संपादक प्रदीप अनंतराव नागापूरकर आणि सहसंपादक अविनाश पाटील यांच्या संपादकीय सहभागातून या दैनिकाची वाटचाल सुरू आहे. कॉम्रेड विचारधारेशी वैचारिक नाते सांगणारी त्याची भूमिका ही सामाजिक विषमता, शोषण, अन्याय, कामगारांचे प्रश्न, सर्वसामान्यांचे जगणे आणि लोकशाही मूल्ये यांसारख्या विषयांकडे पाहण्याची एक विशिष्ट दृष्टी देते. विचारधारा कोणतीही असो, तिचे खरे सामर्थ्य समाजातील वंचित, दुर्लक्षित आणि उपेक्षित घटकांच्या प्रश्नांना किती प्रभावीपणे मांडले जाते, यातूनच सिद्ध होते. 'नांदेड वार्ता'चे वेगळेपण केवळ राजकीय घडामोडींच्या वृत्तांकनात शोधता येणार नाही. शासनाच्या धोरणांची चिकित्सा, प्रशासनातील अनियमिततेवर प्रश्नचिन्ह, लोकप्रतिनिधींच्या कामकाजाचा लेखाजोखा आणि जनतेच्या मूलभूत प्रश्नांची मांडणी यांतून वृत्तपत्राची लोकशाहीतील भूमिका अधिक स्पष्ट होते. सत्तेच्या जवळ जाण्यापेक्षा सत्तेला जनतेच्या प्रश्नांसमोर उभे करणे, ही पत्रकारितेची खरी कसोटी आहे. कारण वृत्तपत्राने सत्तेचे गुणगान करण्यापेक्षा सत्तेला प्रश्न विचारण्याचे धाडस दाखवले पाहिजे. माझ्या स्वतःच्या लेखनप्रवासातही 'नांदेड वार्ता'ने माझ्या विविध लेखांची दखल घेतली आहे. शासनाला जाब विचारणारे, प्रशासनाला त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देणारे, शिक्षणव्यवस्था, सामाजिक विषमता, शेतकरी, पर्यावरण, मूल्यशिक्षण, मानवी नातेसंबंध आणि सामाजिक प्रश्नांवर भाष्य करणारे माझे लेख या दैनिकाने वाचकांसमोर आणले. लेखकाच्या विचारांना वृत्तपत्रातून व्यासपीठ मिळणे ही आनंदाची बाब असली, तरी त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्या विचारांमुळे समाजात चर्चा घडून येणे आणि संबंधित यंत्रणेला आत्मपरीक्षणाची संधी मिळणे होय. वृत्तपत्र हे संपादकाच्या विचारांचेच नव्हे, तर समाजातील विविध विचारप्रवाहांचेही व्यासपीठ असले पाहिजे. वैचारिक मतभिन्नतेचा आदर, वस्तुनिष्ठ बातमीदारी, पुराव्याधारित लेखन, सत्ताधाऱ्यांवरील टीकेबरोबरच चांगल्या कामाचे कौतुक आणि सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्याची तळमळ या गुणांनी पत्रकारितेची विश्वासार्हता वृद्धिंगत होते. डिजिटल माध्यमांच्या झपाट्याने वाढणाऱ्या प्रभावाच्या काळातही मुद्रित वृत्तपत्राने आपली वैचारिक विश्वासार्हता जपणे ही काळाची गरज आहे.पंचवीस वर्षांचा प्रवास हा केवळ कालखंडाचा टप्पा नसतो; तो संघर्ष, सातत्य, अनुभव आणि समाजाशी निर्माण झालेल्या नात्याचा दस्तऐवज असतो. 'नांदेड वार्ता'ने यापुढील काळातही ग्रामीण भागातील प्रश्न, बेरोजगारी, शिक्षणातील विषमता, आरोग्यसेवेतील त्रुटी, शेतकऱ्यांचे प्रश्न, कामगारांचे हक्क आणि लोकशाही संस्थांची जबाबदारी यांना प्राधान्य देत आपली सामाजिक भूमिका अधिक व्यापक करावी. नव्या पिढीतील लेखक, विचारवंत, अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्त्यांना अभिव्यक्तीची संधी देत लोकशाहीतील संवाद अधिक समृद्ध करावा. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, वृत्तपत्राचे खरे यश त्याच्या पानांच्या संख्येत किंवा प्रसिद्धीच्या झगमगाटात नसते; तर त्याने किती प्रश्न समाजासमोर आणले, किती दुर्लक्षित आवाजांना व्यासपीठ दिले आणि सत्ताकेंद्रांना जनतेच्या प्रश्नांची जाणीव किती प्रभावीपणे करून दिली, यात असते. कारण वृत्तपत्राने आरसा दाखवला पाहिजे, प्रश्न विचारले पाहिजेत आणि अन्यायाविरुद्ध लोकमत जागृत केले पाहिजे. हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. 'नांदेड वार्ता'च्या पंचवीस वर्षांच्या वाटचालीला मनःपूर्वक शुभेच्छा!



- पंडित पवळे, शिक्षणयोगी, नांदेड.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

हदगाव नगरपालिकेत सोयीचे राजकारण;नागरी समस्यांवर नेत्यांचे मौन

शेख चांदपाशा

हदगाव-हदगाव नगरपरिषदेची निवडणूक होऊन जवळपास एक वर्षाचा कालावधी लोटत आहे. निवडणुकीच्या काळात शहराच्या विकासासाठी प्रतिष्ठा पणाला लावणारे विधानसभा क्षेत्रातील विविध पक्षांचे दिग्गज नेते आता मात्र शहरातील नागरी समस्यांकडे पाठ फिरवत असल्याचे सध्या तरी चित्र दिसून येत आहे. न.पा च्या निवडणुकीच्या रणधुमाळीत विकासाच्या मोठमोठ्या घोषणा करणारे स्थानिय बडे नेते सध्या आपापल्या कामात मश्गुल असल्याने शहरातील निकृष्ट दर्जाच्या नागरी विकासकामांवर आवाज उठविण्यास कोणीही पुढे येत नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

गतवर्षी नगरपरिषदच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर, माजी खा. सुभाष वानखेडे, खा. नागेश पाटील आष्टीकर आणि आ.बाबुराव कदम कोहळीकर या दिग्गज नेत्यांनी आपापल्या पक्षाच्या उमेदवारांसाठी जोरदार प्रचार केला होता. मात्र, हदगाव शहराच्या मतदारांनी कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न देता सर्वच प्रमुख पक्षांना प्रतिनिधित्वाची संधी दिली. हदगाव नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे ६, शिवसेना ठाकरे गटाचे ७, काँग्रेसचे ५ आणि भाजपचे ३ नगरसेवक निवडून आले आहेत. विशेष म्हणजे शिवसेना ठाकरे गटाला सर्वाधिक सात जागा मिळाल्या. मात्र, तत्कालीन ठाकरे गटाचे नेतृत्व करणारे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी नंतर शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्याने या सात नगरसेवकांच्या राजकीय भूमिकेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. हे नगरसेवक नेमके ठाकरे गटाचे की शिंदे गटाचे, तसेच त्यांचे राजकीय नेतृत्व कोण करणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या राजकीय पेचाचा अद्यापही स्पष्ट खुलासा झालेला नसल्याने शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. काँग्रेसचे माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचे पाच नगरसेवक नगरपरिषदेत प्रतिनिधित्व करीत आहेत. मात्र, विरोधी पक्षाची भूमिका बजावताना शहरातील नागरी सुविधांचा अभाव, विकासकामांतील नियोजनशून्यता आणि सिमेंट रस्त्यांच्या कामांच्या दर्जाबाबत अपेक्षित आक्रमकता दिसून येत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. विरोधी पक्ष म्हणून प्रशासनाला जाब विचारणे, निकृष्ट कामांवर आवाज उठविणे आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी ठोस भूमिका घेणे अपेक्षित असताना काँग्रेसची भूमिका सध्या 'बोटचेपी' असल्याची टीका होत आहे. माजी आ. जवळगावकर यांनी तरी शहरातील नागरी सुविधा व समस्यांबाबत आणि विकासकामांच्या गुणवत्तेबाबत आपले ''मौन'' सोडावे, अशी मागणी काँग्रेसच्या प्रभागातील नागरिकांकडून होत आहे. शिवसेना शिंदे गटाचे सहा नगरसेवक आ. बाबुराव कदम कोहळीकर यांच्या नेतृत्वाखाली, तर माजी खा. सुभाष वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. नगराध्यक्षपदाची जबाबदारी रोहिणी वानखेडे सांभाळत आहेत. मात्र, निवडणुकीच्या काळात नागरी सुविधांबाबत ज्या आक्रमकपणे विकासाची आश्वासने आणि भाषणे केली जात होती, तोच आक्रमकपणा सध्या प्रत्यक्ष कारभारात दिसून येत नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. दुसरीकडे, खा. नागेश पाटील आष्टीकर समर्थक गटाच्या उपनगराध्यक्षा भोळे नावाच्या महीला असून यांच्याकडूनही शहरातील नागरी सुविधांबाबत अद्याप ठोस भूमिका सार्वजनिकरीत्या समोर आलेली नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधी गटातील लोकप्रतिनिधींच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित होत आहेत. शहरात सुरू असलेल्या सिमेंट रस्ते आणि नाल्यांच्या कामांमध्ये नियोजनाचा अभाव असल्याची तक्रार वारंवार पुढे येत आहे. काही प्रभागांतील सिमेंट रस्त्यांच्या कामांमुळे धूळ उडत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्यांची कामे पूर्ण होण्यापूर्वीच त्यांच्या दर्जाबाबत शंका उपस्थित होत असताना संबंधित यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी याकडे गांभीर्याने लक्ष देत आहेत का, असा सवाल उपस्थित होत आहे. जिल्हयातील बड्या नेत्याच्या निकटवर्तीय कंत्राटदाराकडे सुमारे अकरा कोटी रुपयांची विकासकामे असल्याची माहिती चर्चेत आहे. या कामांमध्ये सिमेंट रस्ते आणि नाल्यांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे कुठेही कामाच्या बाबतीत कुठेही फलक लावले नाहीत. सदरील काम सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा नगर परिषदेकडे आहे हे समजणे पण कठीण झाले आहे. कामांचे नियोजन, प्रत्यक्ष गुणवत्ता, तांत्रिक देखरेख आणि खर्चाच्या तुलनेत मिळणारा दर्जा याबाबत पारदर्शकता असणे आवश्यक आहे. या कामांची सक्षम यंत्रणेमार्फत गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असताना कोणत्याही प्रमुख राजकीय पक्षाच्या स्थानिक नेत्यांकडून किंवा नगरसेवकांकडून ठोस आक्षेप अथवा सार्वजनिक तक्रार समोर येत नसल्याने राजकीय सोयीच्या भूमिकेबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



गुरु-त्ता-गद्दी कार्यक्रमानिमित्त सचखंड गुरुद्वारा येथुन भव्य नगरकिर्तन मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने शिख बांधव सहभागी झाले होते.

वामननगरमध्ये सव्वा लाख रुपयांची घरफोडी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील वामननगर येथे अज्ञात चोरट्यांनी एका बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून सव्वा लाख रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे. अमोल अनंतराव हाळे (वय ३७) रा.वामननगर, नांदेड हे घराला कुलूप लावून कुटुंबियांसमवेत बाहेरगावी गेले असतांना अज्ञात चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिणे व रोख रक्कम असा सव्वा लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला आहे.

हानेगाव ते कर्नाटक सीमा रस्ता की मृत्यूचा सापळा?प्रशासन झोपलंय का?



देगलूर/प्रतिनिधी-हानेगावहून कर्नाटक बॉर्डरकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाऊल ठेवले की प्रश्न पडतो, आपण रस्त्यावरून चालतोय की शेतातील पाणंदातून? कारण हानेगाव - कामाजीवाडी ते कर्नाटक बॉर्डर या संपूर्ण रस्त्यावर आता डांबर कमी आणि खड्डेच जास्त दिसत आहेत. रस्त्यात खड्डा आहे की खड्ड्यात रस्ता आहे, हेच कळत नाही, अशी भयंकर अवस्था झाली आहे.

या रस्त्याचे महत्त्व केवळ दोन गावांना जोडण्यापुरते नाही. या रस्त्यावरून दररोज हजारो शीख बांधव बिदर येथील जगप्रसिद्ध गुरुद्वारा श्री नानक झिरा साहिब येथे दर्शनासाठी जातात. नांदेड येथील तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा येथे दर्शनासाठी आलेले भाविक दररोज बिदर येथे जात असतात. देगलूर, हानेगाव मार्गे बिदरकडे जाणाऱ्या भाविकांसाठी हा सर्वात जवळचा आणि महत्त्वाचा मार्ग आहे. श्री.गुरुनानकदेवजी जयंती, गुरुपर्व, वैशाखी, तसेच दर महिन्याला होणाऱ्या कार्यक्रमासाठी पंजाब, हरियाणा, दिल्ली, नांदेड, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शीख बांधव कुटुंबासह या मार्गाने प्रवास करतात. मात्र या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे त्यांची श्रद्धेची यात्रा त्रासदायक बनली आहे. मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये वाहने आदळून बसतात. वृद्धांना आणि लहान मुलांना प्रचंड त्रास होतो. बाहेरून येणाऱ्या भाविकांसमोर महाराष्ट्राच्या रस्त्यांची लाजिरवाणी प्रतिमा उभी राहत आहे. आम्ही बिदरला गुरुंच्या दर्शनाला जातो. मनात भक्ती असते, पण या रस्त्यावर आले की मनात भीती निर्माण होते. रात्रीच्या वेळी खड्डा दिसत नाही, गाडी आदळते, कधी अपघात होईल याची भीती वाटते. प्रशासनाने आमच्या श्रद्धेचा तरी विचार करावा, अशी कळकळीची व्यथा एका शीख भाविकाने व्यक्त केली.

या भागातील शेतकरीही या रस्त्यामुळे वैतागला आहे. ऊस, सोयाबीन, कापूस, तूर यांसारखा माल बाजारात नेण्यासाठी शेतकऱ्यांना याच रस्त्याने जावे लागते. खड्ड्यांमुळे ट्रॅक्टर, ट्रकचे टायर फुटतात, सस्पेंशन तुटते, डिझेल जास्त लागते. ट्रॅक्टर चालक या रस्त्यावर यायला तयार होत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्याला दुप्पट भाडे मोजावे लागत आहे. आमच्या शेतमालाचा भाव आधीच नाही, त्यात रस्त्यामुळे वाहतूक खर्च वाढतोय. आम्ही जगायचं कसं? असा सवाल शेतकऱ्यांनी केला आहे. या रस्त्यावरून शाळा, कॉलेजला जाणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. बस वेळेवर पोहोचत नाही. खड्ड्यांमुळे बस हादरते, विद्यार्थी खाली पडतात. तर एखादा गंभीर रुग्ण असेल तर रुग्णवाहिकेला देखील या रस्त्यावरून जाताना जीव मुठीत घेऊन जावे लागते. सदरील कायमस्वरूपी दर्जेदार डांबरी रस्ता हवा आहे. अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

परखड लेखनीतून दिवंगत प्रदीप वाकोडीकरांनी न्याय देण्याचा प्रयत्न केला

श्रद्धांजली सभेत मान्यंवरांच्या भावना

किनवट/प्रतिनिधी-चाळीस वर्षांच्या सर्वसमावेशक पत्रकारीतेचा वसा इत्तर पत्रकारांनी जोपासला तरच स्व.प्रदीप वाकोडीकरांना श्रद्धांजली अर्पीत केल्याचे समाधान मिळेल. स्व.वाकोडीकरांची उणीव ही नेहमीच भासणार आहे. परखड लेखणीच्या माध्यमातून त्यांनी न्याय देण्याचा प्रयत्न केलाय, अशा आशयाच्या भावोद्गारातून मान्यवरांनी स्व. वाकोडीकरांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

पत्रकारांच्या वतीने १६ नोव्हेंबर रोजी साईबाबा मंदिर संस्थानच्या सभागृहात श्रद्धांजलीचा कार्यक्रम आयोजित केला होता. दरम्यान किनवट तालुक्यातील पत्रकारांसह काही राजकीय पक्ष आणि किनवट नगर परिषदेच्या माजी-आजी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. सरस्वती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मार्तंड कुलकर्णी, किनवट नगर परिषदचे माजी नगराध्यक्ष आनंद मच्चेवार, माजी नगराध्यक्ष के.मुर्ती, भाजपाचे सुधाकर भोयर, रा.काँ.चे वैजनाथ करपुडे, पत्रकार फुलाजी गरड, पत्रकार परविना शेख, दगडू भरकड, पत्रकार प्रकाश कार्लेवाड अशा अनेक मान्यवरांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केले. संचलन पत्रकार बापूसाहेब तुप्पेकर यांनी केले.



उपलब्ध सिंचनाचे पाणी चारा पिकांसाठीच वापरा-जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

नांदेड/प्रतिनिधी- अल निनोच्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर उद्भवू शकणाऱ्या पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन व जपून वापर करणे आवश्यक आहे. सिंचनासाठी उपलब्ध होणारे पाणी प्राधान्याने चारा पिकांसाठी व सध्या शेतात उभ्या असलेल्या पिकांसाठीच वापरावे. नव्याने ऊस किंवा अधिक पाण्याची आवश्यकता असलेल्या तत्सम पिकांची लागवड टाळावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाई परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आज, दि. १५ नोव्हेंबर रोजी बैठक घेण्यात आली. यावेळी उपलब्ध पाणीसाठा, सिंचनाची आवर्तने, पाणीपुरवठा आणि नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्ह्यातील काही सिंचन प्रकल्पांमधून उपलब्ध पाणीसाठ्यानुसार सिंचनाची आवर्तने सुरू आहेत. या पाण्याचा वापर केवळ सध्या शेतात उभ्या असलेल्या पिकांसाठी करावा. सिंचनासाठी उपलब्ध होणारे पाणी विहिरी, शेततळी किंवा अन्य खासगी पाणीसाठे भरण्यासाठी वापरू नये. संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

रब्बीच्या पाण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आमरण उपोषण

नायगाव/प्रतिनिधी-बिलोली तालुक्यातील व नायगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी सिंचनाचे पाणी मिळावे, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने सोमवार, दि.१६ नोव्हेंबरपासून सिंचन शाखा राहेर येथील पटबंधारे विभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. संघटनेचे तालुकाध्यक्ष श्रीपत पाटील साळुंके यांनी ६ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले होते.

बिलोली तालुक्यातील दुगाव, कुंभारगाव, तोरणा, हरणाळा, कोळगाव, खपराळा, कांगठी, कौठा, आरळी तसेच नायगाव तालुक्यातील राहेर यासह अनेक गावांतील शेतकरी सिंचनाच्या पाण्यापासून वंचित आहेत. निम्न मनार प्रकल्पाचे पाणी शेतापर्यंत पोहोचावे, यासाठी शेतकरी संघटनेचा मागील चार वर्षांपासून पाठपुरावा सुरू आहे. मात्र, अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. रब्बी पिकांना पाण्याची गरज लक्षात घेता पात्र गावांसाठी तातडीने एक पाणी आवर्तन सोडावे, कालव्यांची दुरुस्ती, गाळ काढणे व सफाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच गोदावरी नदीवरील बळेगाव बंधाऱ्यातून पाणी उपसा करून सालेगाव येथील निम्न मनार प्रकल्पाच्या कालव्यांत सोडण्याच्या योजनेची व्यवहार्यता तपासून सविस्तर डीपीआर तयार करावा व शासनाकडे सादर करावा, अशी प्रमुख मागणी आहे. याशिवाय राहेर येथील सिंचन शाखेचे कार्यालय व अभिलेख पुन्हा राहेर येथे आणून कामकाज पूर्ववत सुरू करावे, तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कालबद्ध कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **SYEDA ALIZA HUSSAIN** which now I am, changing as (new name) **SYEDA ALIZA HUSSAIN SYED AADIL HUSSAIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
SYEDA ALIZA HUSSAIN
SYED AADIL HUSSAIN
R/o H.No.9-7-282/2, Plot no.28,
Hyder bagh no.02 Degloor naka Nanded-431604
Mob.no. 9370622633

CHANGE IN NAME

My (old name) is **SIDDIQUI MARYAMBOOTUL MAQSOOD AHEMAD** which now I am, changing as (new name) **SYEDA MARYAM HUSSAIN SYED AADIL HUSSAIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
SYEDA MARYAM HUSSAIN
SYED AADIL HUSSAIN
R/o H.No.9-7-282/2, Plot no.28,
Hyder bagh no.02 Degloor naka Nanded-431604
Mob.no. 9370622633

रवि रामू कलोसे नांदेड दौऱ्यावर

नांदेड/प्रतिनिधी- राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य रवि रामू कलोसे हे १९ व २० नोव्हेंबर रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

गुरुवार १९ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वा. ते लातूर येथून मोटारीने नांदेडकडे प्रयाण करतील. सायंकाळी ६.३० वा. त्यांचे नांदेड येथे आगमन व मुक्काम. शुक्रवार २० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. नांदेड वाघाळा शहर महानगर - पालिकेच्या सभागृहात मनपा आयुक्त, पोलीस अधीक्षक, जिल्हा शल्यचिकित्सक तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी आणि सफाई कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार आहेत. या बैठकीत सफाई कर्मचाऱ्यांच्या अडचणी, समस्या व विविध प्रश्नांवर चर्चा करून त्यांचा आढावा घेण्यात येणार आहे. दुपारी १ वा. ते पत्रकारांशी संवाद साधतील. त्यानंतर दुपारी ३ वा. मोटारीने उमरखेडकडे प्रयाण करतील.

स्वारातीम विद्यापीठात बिरसा मुंडा जयंती साजरी

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात बिरसा मुंडा यांची जयंती आज, दि.१५ नोव्हेंबर रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आयोजित जयंती कार्यक्रमात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, उपकुलसचिव रामदास पेद्देवाड, अधीक्षक एच. आर. डोंगरे, अनिल कळसकर यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

टाकळी,नेर,लिंबायत,सायफळ,हिंगणीच्या नदीपात्रांतून बेफाम रेती उपसा

तहसीलदार सुट्टीवर;रेतीमाफियांची दिवाळी

सरफराज दोसानी

माहूर - दिवाळी साजरी करण्यासाठी तहसीलदार सुट्टीवर गेल्याची संधी साधत माहूर तालुक्यात रेती माफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातल्याचे चित्र समोर येत आहे. टाकळी, नेर, लिंबायत, सायफळ आणि हिंगणी परिसरातील नदीपात्रांतून बिनदिक्कत रेतीचा उपसा आणि वाहतूक सुरू असल्याची चर्चा आहे. महसूल विभागाच्या देखरेखीचा अभाव असल्याने रेतीतस्करांचे फावले असून, नदीपात्रांवर जणू माफियांनीच कब्जा केल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

रेतीतस्करांनी यासाठी कथितरीत्या नवी शक्कल लढविल्याची माहिती समोर येत आहे. सायफळ, टाकळी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर रेतीचा साठा जमा केला जात असून, त्यानंतर महसूल विभागाकडून संबंधित ठिकाणी छापा टाकून साठा जप्त करायचा आणि त्याचा लिलाव करायचा, अशी पद्धत वापरली जात असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, ज्या लोकांनी हा रेतीसाठा जमा केला, त्यांच्याच संबंधितांकडून लिलावात तो पुन्हा खरेदी करून वाहतूक केली जात असल्याची कथित प्रथा असल्याची माहिती मिळाली आहे. हा प्रकार खरा असेल, तर लिलावाच्या प्रक्रियेचा वापर करून अवैध रेती उपशाला कायदेशीर स्वरूप देण्याचा या गंभीर प्रकार कडे जिल्हाधिकारी यांनी विशेष पथक पाठवून कार्यवाही करण्याची गरज आहे. दि.१० नोव्हेंबरपासून हा लुटीचा खेळ सुरू असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, सायफळ नदीपात्रात जाण्यासाठी स्वतंत्र रस्ताही तयार करण्यात आल्याचे दिसून येत आहे. पोकलेन आणि अन्य यंत्रसामग्रीच्या साह्याने नदीपात्रातून रेतीचा उपसा सुरू असल्याचे आरोप होत आहेत. दुष्काळी परिस्थितीमुळे नदीपात्रे कोरडी पडली असताना रेतीतस्करांनी पैनगंगा नदीच्या पात्रावरच घाला घातल्याचे चित्र आहे. रेतीमाफिया एकत्रितपणे संघटित होऊन 'अवचोरो, बांधो, भारा आधा तुम्हारा आधा हमारा' अशा वृत्तीने नैसर्गिक संपत्तीची लूट करीत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे. एकीकडे शासन पर्यावरण संवर्धन आणि नदीपात्रांचे संरक्षण करण्याच्या घोषणा करते, तर दुसरीकडे प्रत्यक्षात नदीपात्रांची अक्षरशः चाळण केली जात असल्याचे आरोप होत आहेत. यासाठी जवाबदार असलेल्या महसूल विभागाच्या कारभारावर यापूर्वीही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुरली येथील गट क्रमांक ११७ मध्ये झालेल्या कथित अवैध मुरूम उत्खनन आणि हजारो ब्रास मुरूम वाहतुकीचा मुद्दा अद्याप चर्चेत आहे. अधिकृत ऑनलाइन पावत्या नसतानाही मुरूम वाहतूक झाल्याची तक्रार महसूल विभागाच्या टेबल वर थंड बस्त्यात पडलेली असून, या प्रकरणात महसूल विभागाकडून ठोस आणि पारदर्शक कारवाई झाल्याचे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यातच आता रेतीतस्करांनी पुन्हा डोके वर काढल्याने तालुक्यात गौण खनिजांची लूट बेधडक सुरू असल्याचे चित्र आहे. एरवी छोट्या-मोठ्या प्रकरणांत कारवाईचा बडगा उगारणारा महसूल विभाग या मोठ्या उत्खननाच्या प्रकरणांत मात्र शांत का? तहसीलदारांच्या अनुपस्थितीत नदीपात्रांत सुरू असलेल्या हालचालींची माहिती संबंधित यंत्रणेला नाही का? सायफळ नदीपात्रात साठवण्यात येत असलेल्या रेतीच्या साठ्याची अधिकृत परवानगी आहे का? लिलावाची प्रक्रिया पारदर्शक आहे का? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, या संपूर्ण प्रकारामागे कोणाचे अभय आहे? या प्रश्नांची उत्तरे जिल्हा प्रशासन आणि महसूल विभागाने देणे गरजेचे आहे. अन्यथा नैसर्गिक संपत्तीची अशीच लूट सुरू राहिली, तर भविष्यात माहूर तालुक्याची ओळखही अवैध गौण खनिज उत्खननासाठी होण्याची भीती आहे. वेळीच लगाम घातला नाही, तर माहूरचा बीड होऊ नये म्हणजे झाले.

दोन गोवंशाची पोलीसांनी केली सुटका

नांदेड/प्रतिनिधी- अवैधरित्या दोन गोवंश बांधुन ठेवल्या प्रकरणी इतवारा नांदेड ग्रामीण पोलीसांनी तीन जणांना अटक केली आहे.

आस कॉलनी भागात अनधिकृतरित्या दोन गोवंश हत्येसाठी बांधुन ठेवल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पोलीसांच्या पथकाने शनिवारी धाड टाकुन दोन गोवंशाची सुटका केली. पोलीसांनी मजिदरा रा.अर्धापूर, अरबाज कुरेशी, अकरम कुरेशी रा.टायर बोर्ड,नांदेड या तीघांना अटक केली आहे. त्यांच्या विरोधात नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

किनवट मतदारसंघात राष्ट्रवादीचे संघटन बांधणीसाठी बेबीताई नाईक सक्षम

किनवट/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटात एकत्रिकरणाच्या चर्चांच्या उफाळ्या पहाता किनवट विधानसभा मतदारसंघातील राजकीय वर्तुळात नवीन समिकरणाचा बागुलबुवा उभा केला जातोय, परंतु राष्ट्रवादी काँग्रेसची उभारणी करण्यात ज्या स्व.प्रदीप नाईकांचा सिंहांचा वाटा होता, त्यांच्या पश्चात श्रीमती बेबीताई नाईकच बंजारा समाजासह राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रबळ नेतृत्व आणि पक्षसंघटन मजबूत करु शकतात हे सांगण्यासाठी भविष्यकाराची गरज नसल्याच्या जोरदार प्रतिक्रिया ऐकायला मिळताहेत. पक्षांतराच्या कोल्हांटउड्या मारुन मागच्या विधानसभा निवडणुकीत केवळ पाच हजार मते मिळवून डिपॉझिट रक्कम वाचवू न शकलेल्या सचिन नाईकांकडे कसलीही जिम्मेदारी दिली जाणार नसल्याचे आतल्या वर्तुळातून ऐकायला मिळाले.



सचिन नाईकांच्या पक्षसंघटन कौशल्याची ताकद २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी अजमावली होती त्यावेळी केवळ पाच हजार मतांवर समाधान मानावे लागले. मित्र मंडळाच्या माध्यमातून संघटनात्मक मोर्चेबांधणी करताना मतदारसंघ पिंजून काढला. साम-दामानंतर सुद्धा हा निच्चांक पहायला मिळला म्हणून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्या तरी आणि नाही आल्यातरी श्रीमती बेबीताई नाईकांचं प्राबल्य पुरेसे वाटते. स्थानिक पातळीवर पक्षातील काही जणांच्या पक्षांतरामुळे पक्ष कमकुवत होईल अशी काहींची धारणा होती, परंतु स्व.नाईकांच्या घराण्यावरचे प्रेम बंजारा समाजाने आणि चाहत्यांनी एत्क्विंचितही ढळू दिलेले नाही. सहानुभूती आजही कायम असल्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये त्याचा नक्कीच फायदा होईल असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्तुळातून व्यक्तविला जात आहे. अजित पवार गटाच्या माध्यमातून बंजारा समाजात संघटन मजबूत करण्याचे प्रयत्न आणि माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या १२ ते १५ वर्षांपासून सुरू असलेली राजकीय सक्रियता, हे त्यांच्या समर्थकांकडून प्रभावाचे दाखले म्हणून पुढे केले जात आहेत. मात्र, राजकारणात वर्षांची सक्रियता आणि मतपेटीतून मिळणारा जनाधार या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत, याचा विसर पडता कामा नये. कारण मागील विधानसभा निवडणुकीत पूर्ण ताकदीने मैदानात उतरूनही सचिन नाईक यांना अवघ्या पाच हजारांच्या आसपास मतांवर समाधान मानावे लागल्याचा मुद्दा आजही त्यांच्या राजकीय क्षमतेच्या चर्चेत उपस्थित केला जात आहे. या मतविभाजनाचा दिवंगत माजी आ.प्रदीप नाईक यांच्या पराभवावर परिणाम झाल्याचा आरोपही विरोधकांकडून केला जातो. अर्थात, पराभवाची सर्व जबाबदारी एका घटकावर टाकणे योग्य नसले, तरी या राजकीय आरोपाचे उत्तर देण्याची जबाबदारी संबंधितांवर निश्चितच आहे. विशेष म्हणजे, स्वतःच्या निवडणूक कामगिरीतून भक्कम जनाधार सिद्ध करण्याचे आव्हान अद्याप कायम असताना इतरांच्या राजकीय भवितव्याचे गणित मांडण्याची घाई कशासाठी, असा बोचरा सवाल टीकाकार उपस्थित करीत आहेत. पाच हजार मतांच्या पायावर राजकीय प्रभावाचे इमले उभारता येतीलही; मात्र त्यांना जनाधाराचा मजबूत पाया आहे की केवळ समर्थकांच्या घोषणांचा मुलामा, हे आगामी काळच स्पष्ट करेल. राजकारणात सहानुभूतीची लाट, समाजाची समीकरणे, नेत्यांचे आशीर्वाद आणि संघटनात्मक दावे यांना महत्त्व असतेच; पण अखेरीस मतदारांचा कौलच नेतृत्वाची उंची ठरवतो. त्यामुळे केवळ राजकीय मार्गदर्शकांच्या छायेत राहून किंवा संभाव्य युतीच्या गणितावर स्वार होऊन नेतृत्व सिद्ध होत नाही. त्यासाठी स्वतःची विश्वासार्हता, व्यापक जनसंपर्क आणि निवडणुकीत मतांचे रूपांतर करण्याची क्षमता दाखवावी लागते. आता प्रश्न एवढाच की, सचिन नाईक आगामी निवडणुकीत स्वतःचा जनाधार वाढवून राजकीय सामर्थ्य सिद्ध करणार की जुन्या राजकीय समीकरणांच्या आधारावरच प्रभावाचे दावे करीत राहणार? किनवट-माहूरच्या मतदारांना राजकीय दाव्यांपेक्षा प्रत्यक्ष कामगिरीचे मोजमाप अधिक महत्त्वाचे वाटते. त्यामुळे आगामी काळात समर्थकांच्या घोषणांचा आवाज मोठा ठरतो की मतदारांचा कौल, याकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

आव्हाडांच्या तीन शब्दांनी राष्ट्रवादीत खळबळ!

मुंबई/प्रतिनिधी- दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांना वेग आला असतानाच आ.जितेंद्र आव्हाड यांच्या व्हॉट्सप स्टेटसने राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. ''दैव जाणिले कुणी'' असे तीन शब्दांचे स्टेटस ठेवल्यानंतर राजकीय चर्चांना उधाण आले. मात्र, काही वेळातच त्यांनी हे स्टेटस हटविले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी यामागील कारण स्पष्ट केले.



दरम्यान, मतदारसंघ पुनर्रचना आणि महिला आरक्षण विधेयकाबाबत सुप्रिया सुळे यांनी सकारात्मक भूमिका मांडल्यानंतर पक्षात वेगवेगळे मतप्रवाह समोर आले आहेत. जितेंद्र आव्हाड यांच्या कन्या आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक सरचिटणीस नताशा आव्हाड यांनी या विधेयकाला पाठिंबा देण्याच्या संभाव्य भूमिकेला तीव्र विरोध केला. या विधेयकामुळे विरोधकांच्या जागा मर्यादित करण्याचा आणि भाजपला राजकीय फायदा मिळवून देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून केला. पक्षाने आपल्या भूमिकेचा फेरविचार करावा, अशी मागणीही त्यांनी केली. कन्येच्या भूमिकेबाबत बोलताना जितेंद्र आव्हाड यांनी तिच्या स्वतंत्र विचारांचे समर्थन केले. 'नताशा माझी एकुलती एक कन्या आहे. तिच्यावर अंकुश आणण्याचे काम आम्ही केले नाही. आमच्यावर पवारसाहेबांचे उपकार आहेत, हे मला समजते; तिला कदाचित कळले नसेल,' असे ते म्हणाले. आपल्या व्हॉट्सप स्टेटसबाबत स्पष्टीकरण देताना आव्हाड म्हणाले, 'मी गाणे ऐकत बसलो होतो आणि ते स्टेटसला गेले.' मात्र, त्याचवेळी त्यांनी शरद पवार यांच्यावरील निष्ठा स्पष्ट केली.



धर्माबाद येथील फुलेनगरमध्ये पोलीसांनी धाड टाकुन गुटखा विक्री करणाऱ्या एका आरोपीस अटक केली आहे. त्याच्या जवळून शासनाने प्रतिबंधीत केलेला विविध कंपनीचा गुटखा पोलीसांनी जप्त केला.

थकीत वेतन व इतर मागण्यांसाठी नायगाव वनीकरण कामगारांचे बेमुदत आंदोलन

नायगाव/प्रतिनिधी- सामाजिक वनीकरण विभाग, नायगाव अंतर्गत अनेक वर्षांपासून रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना कामापासून वंचित ठेवण्यात आल्याने आणि त्यांचे वेतन थकीत असल्याने कामगारांनी सोमवारपासून वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. शासकीय औद्योगिक कामगार संघटना (आयटक संलग्न), नांदेड यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

कामगारांना तातडीने कामावर रुजू करून घ्यावे, सेवाज्येष्ठतेनुसार कामाचे वाटप करावे, शासनाच्या नियमानुसार किमान वेतन द्यावे तसेच प्रलंबित वेतन अदा करावे, अशा प्रमुख मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या आहेत. सामाजिक वनीकरण विभागाच्या वृक्षलागवड, रोपवाटिका, वृक्षसंवर्धन यांसह विविध शासकीय कामांमध्ये या कामगारांनी अनेक वर्षे योगदान दिले आहे. मात्र, आता त्यांनाच कामापासून दूर ठेवल्याने त्यांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले असून उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. यासंदर्भात संघटनेच्या वतीने ३ नोव्हेंबर रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी यांना लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र, मागण्यांवर ठोस कार्यवाही न झाल्याने कामगारांनी आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेतला.



या आंदोलनात संघटनेचे अध्यक्ष कॉ. प्रदीप अनंतराव नागापूरकर, उपाध्यक्ष कॉ. अब्दुल गफ्फार, सरचिटणीस कॉ. शिवाजी फुलवळे,कॉ.प्रकाश बैलकवाड यांच्यासह सुशीला आरोटे, तुकाराम भद्रे, चंद्रकांत भद्रे, अशोक धनकवाड, राजाबाई बोईनवाड, उज्वला बागडे तसेच सामाजिक वनीकरण विभागातील महिला व पुरुष कामगार सहभागी झाले आहेत. कामगारांनी अनेक वर्षे शासनाची सेवा केली असताना त्यांना बेरोजगारीच्या खाईत लोटणे अन्यायकारक आहे. त्यांच्या सेवाज्येष्ठतेचा आणि कष्टाचा विचार करून प्रशासनाने तातडीने न्याय द्यावा. मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत बेमुदत धरणे आंदोलन सुरूच ठेवण्यात येईल, असा निर्धार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

जुगार अड्डयावर पोलीसांचा छापा

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील जवाहरनगर येथे पोलीसांनी छापा टाकुन दहा जणांना अटक केली आहे.

जवाहरनगर येथे जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. रविवारी सायंकाळी पोलीसांच्या एका पथकाने जुगार अड्डयावर छापा टाकला. तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना साईनाथ बालाजी कोल्हे (वय २८) याच्यासह दहा जणांना पोलीसांनी अटक केली. त्यांच्याकडून ३७ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरुन

अजितदादांच्या निधनाने...

कारखानदारांशी संबंधित निर्णय आणि ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासासाठी अजित पवारांनी दिलेल्या योगदानाचाही त्यांनी गौरव केला. अजित पवारांच्या आठवणींना उजाळा देताना व्यासपीठावरील वातावरण भावूक झाले. अजितदादांचे कार्य आणि त्यांची स्पष्टवक्तेपणाची शैली कायम स्मरणात राहील, अशा भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या.

अमिताभ बच्चन यांच्या...

बिश्नोईच्या टोळीला अवैध शस्त्रे पुरविण्यापासून त्याने गुन्हेगारी क्षेत्रात सक्रिय सहभाग घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली. पुढे त्याने इतर टोळ्यांसाठी साथीदारांची भरती, शस्त्रांची व्यवस्था आणि टेहळणीची कामे केल्याचा आरोप आहे. या कारवाईनंतर अमिताभ बच्चन यांनी १५ नोव्हेंबरच्या मध्यरात्री सोशल मीडियावर केवळ वाचलो अशी दोन शब्दांची पोस्ट केली. त्यांच्या या पोस्टचा जलसा बंगल्यावरील हल्ल्याच्या कटाशी संबंध आहे का, याबाबत सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली आहे.

ऐन हिवाळ्यातच माहूरकरांना...

संस्थानने भोजंती तलावातील पाणी उपलब्ध करून देत शहराला मोठा दिलासा दिला होता. यंदाही सामाजिक बांधिलकी जपत संस्थानने सहकार्य करावे, अशी अपेक्षा नगरपंचायतीने व्यक्त केली आहे. पैनगंगा नदी कोरडी पडल्याने निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर भोजन्ती तलावाकडे माहूरकरांच्या आशेचा किरण म्हणून पाहिले जात आहे. शहराच्या पाणीप्रश्नावर भोजन्ती तलाव कितपत दिलासा देऊ शकतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. या तलावातील उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन, पाणीपुरवठ्याची सक्षम यंत्रणा आणि आवश्यक उपाययोजना केल्यास आगामी काळात माहूरकरांसाठी भोजन्ती तलाव खऱ्या अर्थाने 'अमृत' ठरू शकतो. मात्र त्यासाठी प्रशासनाने आतापासूनच दूरदृष्टीने नियोजन करणे गरजेचे आहे. पैनगंगेचे कोरडे पात्र आणि समोर उभे ठाकलेले उन्हाळ्याचे संकट पाहता भोजन्ती तलावाच्या पाणीसाठ्याचे महत्त्व आता अधिकच अधोरेखित झाले आहे.

जावरला येथे आदिवासी बांधवांसाठी सेवा व आरोग्य शिबिर उत्साहात

नांदेड/प्रतिनिधी- क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जनजाती गौरव दिन सेवा सप्ताहाअंतर्गत किनवट तालुक्यातील जावरला येथे नुकतेच भव्य सेवा व आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न झाले. दुर्गम भागातील आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ थेट गावात उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जनजाती गौरव दिन सेवा सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहानिमित्त एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट यांच्या वतीने सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी बी. सरवनन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक प्रकल्प अधिकारी (विकास) प्रदीप नाईक यांच्या नियोजनातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात आरोग्य विभागाच्या पथकाने नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले. किनवट येथील तहसील कार्यालयाच्या समन्वयाने पात्र लाभार्थ्यांना आधारकार्ड चे वितरण तसेच आधारकार्डमधील दुरुस्तीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच न्यूक्लिअस बजेट योजनेंतर्गत लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया, महिला बचत गटांना स्वयंरोजगार व अर्थसाहाय्याच्या संधी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी जावरला गावच्या सरपंच नमिताताई गेडाम, उपसरपंच संतोष चांदेकर, माधवराव मरसकोल्हे, माधव शेंद्रे, नागेश मडावी, संतोष गेडाम, ग्रामसेवक तांबारे, तलाठी बोथे यांच्यासह प्रकल्प कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिरात जावरला व कोलामपोड परिसरातील नागरिक, महिला बचत गटांच्या सदस्यांनी आणि युवकांनी सहभाग नोंदविला

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४